जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

28 FEB 2018

# 'मराठीची शिदोरी'ने करवीरकर तृप्त

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पोवाडा सादर करताना नंदेश उमप. सोबत निशा पारसनीस, केतकी चैतन्य, नचिकेत लेले, समीरा गुजर-जोशी आणि अभिनेता जितेंद्र जोशी. (छाया : तय्यब अली)**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अभंग, कीर्तन, लावणी, पत्रलेखन, साहित्य वक्तृत्व अशा विविध क्षेत्रांतील मराठीची वाटचाल आणि प्रवास आधोरेखित करणाऱ्या 'मराठीची शिदोरी' या कार्यक्रमात कलाकारांनी सादर केलेल्या विविध कलाकृतींनी करवीरकर तृप्त झाले.

शिवाजी विद्यापीठ आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त येथील शाहू स्मारक भवनमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उच्च शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. अजय साळी, डॉ. डी. आर. मोरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमास सुरुवात झाली.

डॉ. अरुणा ढेरे यांचे संशोधन आणि संहिता असलेला आणि विनोद पवार दिग्दर्शित या कार्यक्रमात विविध कलाकृतींतून मराठी संस्कृतीची ओळख करून दिली. ओवी, अभंग, लावणी, पोवाडा, कविता नाट्यगीते अशा विविध माध्यमांतून कलाकारांनी आपल्या कलागुणांनी उपस्थितांना चांगलीच सांस्कृतिक मेजवाणी दिली.

'अहो मी कोल्हापूरची लवंगी मिरची' या लावणीपासून नुकत्याच गाजलेल्या 'नटरंग' चित्रपटातील 'वाजले की बारा' या लावणीपर्यंतच्या प्रवासातील विविध लावणींच्या ध्वनीचित्रफितींनी रसिकांना ठेका धरायला लावला. शाहीर उमप यांनी सादर केलेल्या 'तानाजी मालुसरे यांचा पोवाडा' आणि साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेली 'छक्कड माझी मैना गावाकडं राहील' या गीतांना प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात साथ दिली.

निशा पारसनीस यांनी सादर केलेल्या ओवीने कार्यक्रमास सुरुवात झाली. लोकशाहीर नंदेश उमप यांनी सादर केलेल्या 'विंचू चावला विंचू चावला' या भारुडाने उपस्थितांना ठेका धरायला लावले. तर मराठी संगीतात अजरामर ठरलेल्या लावणीच्या ठसक्याने रसिकांचे चांगलेच मनोरंजन केले.

केतकी चैतन्य आणि नचिकेत लेले यांनी सादर केलेल्या 'वेडात मराठे वीर दौडले सात' या गीतास उपस्थितांनी चांगला प्रतिसाद दिला. अभिनेता जितेंद्र जोशी आणि समीरा गुजर-जोशी यांनी केलेले उत्कृष्ट निवेदन उपस्थितांना चांगलेच भावले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा पुस्तक देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अंगाई गीत, ओवी, भजन, कीर्तन, नृत्य, नाट्य संगीतातून मराठी भाषेची आणि संस्कृतीची ओळख होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

28 FEB 2018

# रसिक श्रोत्यांना लोकसंगीताची 'शिदोरी'

## मराठी भाषा दिनानिमित्त 'मराठीची शिदोरी' सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

अभंग, ओवी, भारुड, पोवाडा, लावणी अशा लोकसंगीतांची शिदोरी रसिक श्रोत्यांना शाहू स्मारक भवनमध्ये अनुभवायला मिळाली. मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित 'मराठीची शिदोरी' सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शास्त्रीय संगीत गायिका निशा करजनीस, लोकशाहीर नंदेश उमप, सारेगमप फेम नचिकेत लेले, केतकी चौतन्य यांनी सादर केलेल्या बहारदार लोकसंगीताने रसिक मंत्रमुग्ध झाले. उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कुसुमाग्रज आणि वि. दा. करंदीकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी प्रभारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. अजय दळवी, कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. माने, अभिनेते विजय कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, मराठीची शिदोरी या सांस्कृतिक कार्यक्रमामधून संस्कृती, संस्कार आणि ज्ञानाची शिदोरी मिळणार आहे. ही शिदोरी आयुष्यभरासाठी पुरवायची असेल तर आपण तिचे जतन केले पाहिजे. त्याचबरोबर मराठी संस्कृती टिकविण्यासाठीही अशा सांस्कृतिक शिदोरींची जोपासण करणे गरजेचे आहे. प्रास्ताविक कुलसचिव नांदवडेकर यांनी केले.

यानंतर मुंबईच्या अॅडफीजू कंपनीच्या कलाकारांनी मराठीची शिदोरी या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. निशा कारजनीस यांनी गायलेल्या सुखाचे जे सुख चंद्रभागे तीरी या अभंगाने संगीत मैफलीस प्रारंभ झाला. यानंतर लोकशाहीर नंदेश उमप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेले सूर्य उगवला प्रकाश पडला आडवा डोंगर हे भारुड, तानाजी मालुसरेंचा पोवाडा आणि माझी मैना गावकडं राहिली या भक्कडला रसिक प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटाने विशेष दाद दिली. तर सारेगमप फेम नचिकेत लेले आणि केतकी चैतन्य यांनी सादर कलेली बहिणाबाईंची ओवी माझी मायं सरस्वती माले शिकविते बोली; ज्ञानातून उसळे तलवारीची पात आदी ओवी गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले. तसेच सुप्रसिद्ध मराठी अभिनेते जितेंद्र जोशी आणि समिरा गुजर-जोशी यांच्या निवेदनाने कार्यक्रमाच्या रंगतीत आणखी भर पडली.




कोल्हापूर : मराठीची शिदोरी कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्रभारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अजय दळवी, विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. माने आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

28 FEB 2018

# उलगडली 'मराठीची शिदोरी'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

बहुजनांचे जगणं चोहोबाजूंनी प्रकट करणाऱ्या लोकसंस्कृतीवर आधारित ओव्या, विश्वबंधुत्वाची संकल्पना मांडत पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन घडविणाऱ्या अभंगरचना, शिवकालीन इतिहास ऐकवित वीरश्री निर्माण करणारी शाहिरी पोवाडे आणि मराठी भाषा, लोकजीवनाची महती सांगणाऱ्या कविता गाण्यांच्या सहजसुंदर सादरीकरणाने शाहू स्मारकच्या व्यासपीठावर मराठी संस्कृती अवतरली. तब्बल अडीच तासाहून अधिक काळ रंगलेल्या 'मराठीची शिदोरी' या कार्यक्रमाने मराठी भाषेला लाभलेल्या लोकपरंपरा आणि लोकसाहित्याचे दर्शन घडविले. नृत्य, नाट्य आणि संगीतमय दृकश्राव्यवर आधारित कार्यक्रमाने मराठी रसिक तृप्त झाला.

शिवाजी विद्यापीठ व राज्य सरकारच्या उच्च तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मंगळवारी सायंकाळी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मराठी साहित्यप्रेमींनी खचाखच भरलेल्या सभागृहात रात्री ७.३० वाजण्याच्या सुमारास कार्यक्रमाला प्रारंभ झाला. कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांची संशोधन व संहिता आणि विनोद पवार दिग्दर्शित 'मराठीची शिदोरी'तून अनेकविध कलाप्रकार उलगडत गेले.



शिवाजी विद्यापीठ व उच्च तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'मराठीची शिदोरी'कार्यक्रमात कलाकारांनी लोकगीत, सिनेगीत सादर करत साहित्यप्रेमींची मने जिंकली.

अभिनेता जितेंद्र जोशी व समीरा गुजर-जोशी यांच्या निवेदनाने कार्यक्रमात पहिल्यापासून रंगत भरली. शास्त्रीय गायिका नीशा पारसनीस यांनी 'सुखाचे जे सुख' या अभंगातून पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन घडविले. गायक नंदेश उमप, नचिकेत लेले, केतकी चैतन्य, अभिनेता विजय कदम यांच्या बहारदार सादरीकरणाने कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. नंदेश उमप यांनी सादर केलेला भारुड आणि तानाजी मालुसरे यांच्या जीवनावरील पोवाड्याला रसिक, प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. मराठी सिनेमातील गाजलेल्या लावण्या आकर्षण ठरल्या. ग्रामीण संस्कृती ही अनेकविध वैशिष्ट्यांनी नटलेली. ओवी, अभंग, लावणी पोवाडा, कविता, नाट्यगीते ते सिनेमातील गीतांचा हा प्रवास मराठी मनाला सुखावणारा ठरला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र.कुलगुरू डी. टी. शिर्के, प्राचार्य डी. आर. मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. उच्च शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. अजय साळी यांनी पुस्तक भेट देऊन उपस्थितांचे स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

28 FEB 2018




कोल्हापूर : शाहू स्मारक भवनात मंगळवारी 'मराठीची शिदोरी' कार्यक्रम रंगला. यात छक्कड सादर करताना शाहीर नंदेश उमप व सहकलावंत.

# सुरेल संगीतातून मराठी भाषा संवर्धनाचा संदेश

कोल्हापूर, ता. २७ : बुलंद पोवाडा, भावसाधक भावगीते, सुरेल नाट्यगीते, दिलखेचक लावणी अशा मराठमोळ्या लोकसंगीताच्या विविध छटांनी मराठी भाषा समृद्ध करण्याला हातभार लावला. त्याच्याच विविध भावछटा 'मराठीची शिदोरी' या कार्यक्रमातून उलगडल्या. मराठी भाषा गौरवदिनी मराठी संगीत श्रवण, लेखन व सादरीकरणातून भाषा संवर्धनाचे पाऊल पुढे टाकण्याचा जणू संदेश दिला. शासनाचा तंत्रशिक्षण विभाग व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, ''१४ कोटी लोक मराठी भाषा बोलतात. बोलीभाषेतून मराठी भाषा अधिक समृद्ध झाली आहे.'' डॉ. शिंदे म्हणाले, ''मराठी भाषेची ओळख जन्मल्यापासून होते. अंगाई गीत, बालगीत, भजन, कीर्तन, प्रवचन यापासून ते भक्तिगीतापर्यंत आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ऐकू येतात. त्यात सुसंस्कार आणि ज्ञानाची शिदोरी असते. अशी शिदोरी मराठी भाषेला व मानवी जगण्याला समृद्ध करते.'' यानंतर संगीत मैफलीला सुरुवात झाली. यात निशा पारसनीस यांनी 'सुखाचे हे सुख' हे भक्तिगीत सादर केले. नंदेश उमप यांनी 'सूर्य उगवला प्रकाश पडला...' हे भारूड सादर केले. केतकी चैतन्य यांनी 'माझी माय सरस्वती' हे अंगाई गीत गायिले. तानाजी मालसुरेंवरील पोवाडा व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावाकडे राहिली...' ही छक्कड गायिली. सुमिरा गुजर व अभिनेता जितेंद्र जोशी यांनी निवेदन केले. अरुणा ढेरे यांची संकल्पना होती. प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. आर. मोरे, विनोद पावार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

28 FEB 2018

मराठीची शिदोरी कार्यक्रमाचे सादरीकरण : उच्च, तंत्रशिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजन

# शब्दसामर्थ्यातून उलगडला मराठीचा प्रवास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'माझा मराठीची बोलू कौतुके परी अमृतातेहिं पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळवीन।।' अशा अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या माय मराठीतील ओवी, कीर्तन, भजन, अभंग, लावणी, शाहिरी पोवाडा या शब्दसौंदर्याच्या आणि संस्कृती, परंपरेच्या सादरीकरणातून मंगळवारी 'मराठीच्या शिदोरी'चा प्रवास उलगडला आणि रसिकांचे अनुभवविश्व समृद्ध झाले.

कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनात उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे

नसीर अत्तार



कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनात उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'मराठीची शिदोरी' कार्यक्रमात लोकशाहीर नंदेश उमप यांनी पोवाडा सादर केला.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते. यावेळी प्र-कुलगुरु डी. टी शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विभागीय सहसंचालक अजय साळी, डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, आपल्याला आईच्या कुशीत बसून ऐकलेल्या अंगाई गीतापासून मराठीची ओळख होते. लोकसंस्कृती, कलेतून तिची समृद्ध परंपरा आजवर चालत आली आहे. संस्कृती, संस्कार आणि नवज्ञानाची शिदोरी असलेली ही मराठी भाषा प्रत्येकाने आयुष्यभर पुरवायला हवी. या भाषेचे आणि पर्यायाने संस्कृतीचे जाणीवपूर्वक जतन संवर्धन होऊन ती प्रवाहित ठेवण्याची गरज आहे.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रास्ताविकात म्हणाले, जगात सहा हजार भाषा बोलल्या जातात. त्यात मराठी १७ व्या स्थानावर आहे. तर जगात १४.५ कोटी लोक मराठी बोलतात; त्यामुळे ही भाषा लुप्त होण्याची भीती बाळगण्याची गरज नाही. ही भाषा बोलीभाषेमुळे अधिक समृद्ध झाली आहे; त्यामुळे ती टिकविणे गरजेचे आहे. त्यासाठी सोशल मीडियाचा उपयोग करून मराठीतून अधिकाधिक संवाद साधण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे.

यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. मराठी भाषा आणि संस्कृतीला लाभलेल्या परंपरेची ओळख करून देतानाच समकालीन प्रवाहांचा वेध घेणाऱ्या 'मराठीची शिदोरी' या कार्यक्रमात शास्त्रीय गायिका निशा पारसनीस यांनी 'सुखाचे ते सुख' या अभंगाने गायनाविष्काराची सुरुवात झाली. शाहीर नंदेश उमप यांनी 'अगं गं विंचू चावला' हे भारुड सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. केतकी चैतन्यच्या गोड गळ्याने 'माझी माय सरसोती' या बहिणाबाईंच्या ओवीला सुरात सादर केले.

त्यानंतर नंदेश उमप यांनी तानाजी मालुसरेवरील 'धन्य शिवाजी तोरणागड' हा पोवाडा तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर आधारित पोवाडा (छक्कड) सादर केला. 'वेडात मराठे वीर दौडले सात' या गीताने उपस्थितांमध्ये स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले. ओवी, अभंग, कीर्तन, भजन, गीते, लावणी, शाहिरी अशा विविधांगी साहित्याच्या सुरेल सादरीकरणातून मराठीची समृद्ध परंपरा रसिकांसमोर उलगडली. अभिनेता जितेंद्र जोशी, समिरा गुजर यांनी बहारदार निवेदनातून या शिदोरीचा प्रवास उलगडला.

यावेळी पुरस्कारप्राप्त व्यक्ती व संस्थांच्या कार्याची माहिती देणारी तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी दिलेला संदेश ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

28 FEB 2018

# विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदी किशोरी पसारे

## शिवाजी विद्यापीठ : निवडणूक बिनविरोध; सचिवपदी अमित भिसे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदी कमला महाविद्यालयाची विद्यार्थिनी किशोरी राजू पसारे, तर सचिवपदी साताराच्या आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचा विद्यार्थी अमित विकास भिसे याची बिनविरोध निवड झाली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दोघांचा सत्कार केला. महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्टच्या अंमलबजावणीनंतर विद्यार्थी मंडळासाठी ही पहिलीच निवड प्रक्रिया झाली.



कोल्हापूर : विद्यार्थी कल्याण मंडळाची अध्यक्ष किशोरी पसारे व सचिव अमित भिसे यांचा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे पुस्तक भेट देऊन सत्कार झाला. शेजारी मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव व कार्यकारिणी सदस्य.

दुपारी अडीचच्या सुमारास निवडीस सुरवात झाली. अध्यक्षपदासाठी किशोरी व न्यू कॉलेजचा विद्यार्थी अभिषेक दादासाहेब श्रीराम यांनी अर्ज दाखल केले होते. अभिषेकने अर्ज माघारी घेतल्याने अध्यक्षपदी किशोरीचे नाव निश्चित झाले. सचिवपदासाठी अमित, उंब्रज (ता. कऱ्हाड) येथील मंगलताई जगताप महिला महाविद्यालयातील नम्रता नारायण काटवटे, किर्लोस्करवाडी (ता. पलूस, जि. सातारा) येथील शुभांगी सतीश नलवडे, सातारामधील इस्माईलसाहेब मुल्ला महाविद्यालयातील विशाल जितेंद्र मांडरे यांनी अर्ज दाखल केले होते. पैकी नम्रता, शुभांगी व विशाल यांनी अर्ज माघार घेतल्याने अमितचा सचिवपदाचा मार्ग सुलभ झाला. दोघांच्या निवडीची घोषणा कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केली. तसेच त्यांचा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे पुस्तक देऊन सत्कार केला. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक व समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. या वेळी सिनेट सदस्य प्रा. मधुकर पाटील, दीपक थोरात यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

### केवळ दोन महिन्यांचे कारभारी

किशोरी व अमित पदावर केवळ दोन महिने राहतील. निवड प्रक्रिया लांबल्याने त्यांना एका अधिसभेत प्रश्न विचारण्याची संधी मिळणार आहे. दोन महिन्यांत त्यांचे शिबिरही घेणार असल्याचे विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. गुरव यांनी सांगितले.

### कमी कार्यकाळातही प्रश्न मांडणार

किशोरी पसारे ही नगरसेवक राजू पसारे यांची मुलगी आहे. या निवडीच्या निमित्ताने तिने राजकारणाची पहिली पायरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदी झेंडा फडकवला आहे. ती म्हणाली, ''अधिसभेत विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. भलेही दोन महिन्यांचा कार्यकाळ मिळाला असला, तरी त्याचा पुरेपूर लाभ उठवणार आहे.''

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

28 FEB 2018

## शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ

# अध्यक्षपदी किशोरी पसारे

### साताऱ्याचा अमित भिसे सचिव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदी कमला महाविद्यालयाची विद्यार्थिनी किशोरी राजू पसारे, तर सचिवपदी सातारा येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचा विद्यार्थी अमित विकास भिसे यांची बिनविरोध निवड झाली. व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात मंगळवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडीनंतर विद्यापीठ कॅम्पसमध्ये समर्थकांनी गुलालाची उधळण व आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. अध्यक्षपदासाठी दोन, तर सचिवपदासाठी पाच उमेदवार असताना विद्यार्थी नेत्यांना निवडणूक टाळण्यात यश आले.

विद्यार्थी कल्याण मंडळाच्या निवडणुकीकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. अध्यक्ष व सचिवपदासाठी अनुक्रमे दोन व पाच जण इच्छुक होते. अर्ज भरताना बिनविरोधाचे प्रयत्न फोल ठरले होते. अध्यक्षपदासाठी न्यू कॉलेजमधील अभिषेक श्रीराम व पसारे यांच्यात लढत होईल, असे वातावरण होते; परंतु श्रीराम यांनी माघार घेतल्याने पसारे विजयी झाल्या.

सचिवपदासाठी कराड तालुक्यातील उंब्रज येथील मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालयातील नम्रता काटवटे, सांगली जिल्ह्यातील किर्लोस्करवाडी (ता. पलूस) येथील आर्ट, सायन्स, अँड कॉमर्स कॉलेजमधील शुभांगी नलवडे, सातारा येथील इस्लामसाहेब मुल्ला लॉ कॉलेजमधील विशाल मंद्रे यांनी भरलेले अर्ज माघार घेतले. यानंतर भिसे यांना विजयी घोषित करण्यात आले.



किशोरी पसारे



अमित भिसे

### तीन वर्षांनंतर निवडणूक

*शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाची निवडणूक २०१४-१५ नंतर आज झाली. म्हणजे तीन वर्षांनंतर २०१७-१८ सालाकरिता अध्यक्ष व सचिव सिनेटमध्ये काम करणार आहेत.*

निवडीनंतर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विजयी उमेदवारांना ग्रंथ भेट देऊन अभिनंदन केले.

दरम्यान, निवडीनंतर विद्यार्थ्यांनी मोटारसायकल रॅली काढून जल्लोष केला. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदी किशोरी पसारे हिच्या रूपाने मुलीला संधी मिळाली असल्याने जल्लोषात विद्यार्थिनींचा सहभाग मोठा होता. निवडीनंतर राजारामपुरी परिसरात विजेत्यांचे डिजिटल फलक झळकले. तसेच सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव होत होता. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कार्यरत राहणार असल्याची प्रतिक्रिया पसारे व भिसे यांनी व्यक्त केली. दोघेही शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

28 FEB 2018

# स्टुडंट कौन्सिलची निवडणूक जल्लोषात

## कमला कॉलेजची किशोरी पसारे अध्यक्षपदी, सातान्याचा अमित भिसे सचिवपदी, निवडीनंतर गुलालाची उधळण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलची निवडणूक जल्लोषी वातावरणात पार पडली. यामध्ये कमला कॉलेजची विद्यार्थिनी किशोरी पसारेची अध्यक्षपदी तर सातारा येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचा विद्यार्थी अमित भिसेची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर विद्यार्थ्यांनी गुलालाची उधळण करीत जल्लोष केला. निवडणूक अधिकारी म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी काम पाहिले. निवडीनंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दोघांचे अभिनंदन केले.

विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलच्या अध्यक्षपदासाठी न्यू कॉलेजमधील अभिषेक श्रीराम यांनी माघार घेतली. त्यामुळे किशोरी पसारे यांना बिनविरोध घोषित करण्यात आले. तर सचिवपदासाठी कराड तालुक्यातील उंब्रज येथील मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालयातील नम्रता काटवटे, सांगली जिल्हा तालुका पलूस किर्लोस्करवाडी येथील आर्ट, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेजमधील शुभांगी नलवडे, सातारा येथील इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेजमधील विशाल मंद्रे यांनी माघार घेतली. त्यामुळे सातारा येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील भिसे यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर विद्यापीठ परिसरात एनएसयुआय, राष्ट्रवादी युवक आणि विद्यार्थी कॉंग्रेस व विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी जल्लोष केला. या दोन्ही उमेदवारांना विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, डॉ. क्रांतीकुमार पाटील, प्रताप माने, डॉ. संजय जाधव, ऋतुराज पाटील, विनोद पंडीत, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष रोहीत पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

निवडणुकीनंतर विद्यार्थी संघटना, महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी शिवाजी विद्यापीठ, राजारामपुरीमार्गे अजिंक्यतारा कार्यालयापर्यंत विजयी मिरवणूक काढली. किशोरी ही माजी नगरसेवक राजू पसारे यांची कन्या आहे. राजारामपुरी चौदावी गल्ली येथे पसारे यांच्या निवासस्थानासमोर कॉंग्रेस, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी सभा घेऊन नूतन अध्यक्ष किशोरी पसारे, सचिव अमित भिसे यांचा सत्कार केला.



कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलची निवडणूक झाल्यानंतर अध्यक्षपदी किशोरी पसारे व सचिवपदी अमित भिसे यांची निवड झाल्यानंतर जल्लोष करताना समर्थक.

### विद्यार्थी केंद्रित काम करणार : किशोरी पसारे (अध्यक्ष)



क्रीडा क्षेत्रासह, शैक्षणिक प्रश्न सोडवण्यास प्राधान्य देणार. तसेच डॉ. संजय डी. पाटील आणि ऋतुराज पाटील यांनी दिलेल्या संधीचे सोने करण्याचा मानस आहे. मेरीटनुसार ही शेवटची निवडणूक असून खूप कमी कालावधी आहे. असे असले तरी विद्यार्थी केंद्रीत काम करणार आहे.

### विद्यार्थ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवणार : अमित भिसे (सचिव)



विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयासह विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न आहेत. यामध्ये परीक्षेचे निकाल, वसतिगृहातील समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. एका सिनेटमध्येही विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यास प्राधान्य देऊन ते सोडविण्यासाठी आग्रही राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

28 FEB 2018

## शिवाजी विद्यापीठात जल्लोष : सचिवपदी अमित भिसे; बिनविरोध निवडी

# विद्यार्थी मंडळ अध्यक्षपदी पसारे, सचिवपदी भिसे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदी कोल्हापुरातील कमला महाविद्यालयाची विद्यार्थिनी किशोरी राजू पसारे हिची, तर सचिवपदी साताऱ्याच्या आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचा विद्यार्थी अमित विकास भिसे याची मंगळवारी बिनविरोध निवड झाली. ते दोघे 'विद्यापीठ विकास आघाडी'चे उमेदवार आहेत. दोन वर्षांनंतर विद्यार्थी कल्याण मंडळाच्या निवडणुका झाल्या आहेत.

अध्यक्षपदासाठी न्यू कॉलेजचा सचिव अभिषेक श्रीराम आणि कमला महाविद्यालयाची किशोरी पसारे हे इच्छुक होते. हे दोघे शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीशी संबंधित असल्याने अभिषेकने माघार घेतली. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी ग्रंथभेट प्रदान करून किशोरी आणि अमित यांचा सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते. डॉ. डी. वाय. पाटील ग्रुपचे विश्वस्त ऋतुराज पाटील यांनी नूतन अध्यक्ष आणि सचिव यांचे अभिनंदन केले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विद्यार्थी कल्याण मंडळाचे समन्वयक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी काम पाहिले. निवडीनंतर विद्यापीठामध्ये किशोरी आणि अमित यांचे समर्थक, मित्र-मैत्रिणींनी गुलाल उधळत जल्लोष केला.

किशोरी पसारे ही राजारामपुरी येथे राहते. कमला महविद्यालयात एम. ए. (योगा) च्या द्वितीय वर्षात शिकते. माजी नगरसेवक राजू पसारे यांची ती कन्या आहे. तिने सन २००९ मध्ये कमला महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थिनींचा 'डी. एम.' ग्रुप स्थापन केला असून, त्याद्वारे ती सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. अमित भिसे हा आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये बी. एड.च्या द्वितीय वर्षात शिकतो. त्याचे मूळ गाव निढळ (ता. खटाव) आहे. त्याचे वडील शेतकरी, तर आई गृहिणी आहेत. त्याने बी. एस्सी. अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक पटकविला होता. विद्यापीठ अनुदान आयोगाची त्याला रँक होल्डर शिष्यवृत्ती मिळाली आहे.

दीपक जाधव



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी विद्यार्थी कल्याण मंडळाची निवडणूक झाली. त्यामध्ये अध्यक्षपदी किशोरी पसारे आणि सचिवपदी अमित भिसे याची बिनविरोध निवड झाली. पसारे आणि भिसे यांचे नातेवाईक, समर्थकांनी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर गुलालाची उधळत आनंद व्यक्त केला.

### दोन महिन्यांचा कालावधी

विद्यापीठाचे विद्यार्थी मंडळ हे सन २०१४ मध्ये कार्यरत होते. त्यानंतर नवीन विद्यापीठ कायद्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही, निवडणुकांसाठी परिनियमाच्या उपलब्धतेची प्रतीक्षा या कारणांमुळे या मंडळाची निवडणूक लांबणीवर पडली. त्यामुळे नूतन अध्यक्ष, सचिव आणि सदस्यांना काम करण्यासाठी अवघे दोन महिनेच मिळणार आहेत.



"कमी वेळेत जास्तीत जास्त काम करण्यावर माझा प्राधान्य राहील. जाहीर झालेल्या निकालातील त्रुटी दूर करणे. लांबणीवर पडलेला दीक्षान्त समारंभ लवकर व्हावा यासाठी प्रयत्न करणार आहे.

- किशोरी पसारे, नूतन अध्यक्ष



"विद्यापीठाच्या विद्यार्थी मंडळावर काम करण्याची संधी मिळाल्याने मी खूप आनंदित आहे. विद्यार्थ्यांचे प्रलंबित प्रश्न कमी वेळेत सोडविण्यासाठी प्राधान्य राहील.

- अमित भिसे, नूतन सचिव

जनसपर्क कक्ष
जी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी


2 8 FEB 2018

# विद्यार्थी कल्याण मंडळाच्या निवडी बिनविरोध

## अध्यक्षपदी कोल्हापूरची किशोरी पसारे, सचिवपदी सातारचा अमित भिसे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदी कमला महाविद्यालयाच्या किशोरी पसारे हिची, तर सचिवपदी सातारा येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या अमित भिसे याची निवड झाली. अध्यक्ष आणि सचिव या दोन्ही निवडी अपेक्षेप्रमाणे बिनविरोध झाल्या. निवडींची घोषणा होताच दोन्ही विद्यार्थ्यांनी विद्यापीठात मोठा जल्लोष केला. निवडीनंतर प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पसारे आणि भिसे यांचे ग्रंथ देऊन अभिनंदन केले.




**शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी मंडळाच्या अध्यक्षपदी किशोरी पसारे आणि सचिवपदी अमित भिसे यांची निवड झाल्यानंतर जल्लोष करताना विजयी प्रतिनिधी व इतर.** (छाया : पांडुरंग पाटील)

दोन्ही निवडी बिनविरोध व्हाव्यात यासाठी गेल्या काही दिवसांपासून घडामोडी सुरू होत्या, तर गेल्या दोन दिवसांत निवडणूका बिनविरोधच होतील असेच वातावरण निर्माण झाले होते. अपेक्षेप्रमाणे या दोन्ही पदांसाठीच्या निवडणुका बिनविरोध पार पडल्या. विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्षपदासाठी न्यू कॉलेजमधील अभिषेक श्रीराम याने विकास आघाडी नेतृत्वाच्या सल्लाने अर्ज माघार घेतला. त्यामुळे कमला कॉलेजमधील किशोरी पसारे हिला बिनविरोध घोषित करण्यात आले, तर सचिवपदासाठी कराड तालुक्यातील उंब्रज येथील मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालयातील नम्रता काटवटे, सांगली जिल्हा, तालुका पलूस, किर्लोसकरवाडी येथील आर्ट, सायन्स, कॉमर्स कॉलेजमधील शुभांगी नलवडे, सातारा येथील इस्मालसाहेब मुल्ला लॉ कॉलेजमधील विशाल मांढरे यांनी अर्ज माघार घेतले. त्यामुळे सातारा येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील अमित भिसे याची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. निवडीनंतर विद्यापीठ परिसरात गुलालाची उधळण करत जल्लोष केला.

विद्यार्थी कल्याण मंडळाची निवडणूक झाल्यानंतर कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनी गुलालाची उधळण करत आनंद व्यक्त केला. यामध्ये विद्यार्थी संघटना, महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा समावेश होता. विद्यापीठ अध्यक्षपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची पोस्टर कॉलेजच्या आवारासह राजारामपुरी परिसरात झळकण्यास दुपारीच सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठ ते राजारामपुरी परिसरात दुचाकी रॅली काढण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी काम पाहिले.

### विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणार



आ. सतेज पाटील, डॉ. सजंय डी. पाटील, ऋतुराज पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे ही संधी मिळाली आहे. कालावधी कमी असला तरी विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास प्राध्यान्य देणार आहे. सध्या दीक्षांतला विलंब झाला आहे. तसेच परीक्षा आणि निकालामध्ये विद्यार्थ्यांना अनेक समस्या भेडसावतात. त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

**- किशोरी पसारे,** विद्यार्थी कल्याण मंडळ नूतन अध्यक्ष

### विद्यार्थी हितासाठी काम करणार



विद्यार्थी मंडळाच्या सर्व सदस्यांच्या सहकार्यामुळे बिनविरोध निवड होऊ शकली. आम्हाला कमी कार्यकाल मिळणार आहे, याची जाणीव आहे. तरीही कमी वेळेत चांगले काम करण्याचा प्रयत्न करणार आहे. साताऱ्याला हे पद मिळाले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या उपकेंद्रांना त्याचा उपयोग करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. सिनेटचे सभासदत्वही मिळणार आहे, त्यामुळे तेथेही विद्यार्थी हिताच्या निर्णयांना प्राधान्याने पाठिंबा देणार आहे. ऋतुराज पाटील आणि विकास आघाडीच्या सर्व सदस्यांचे मार्गदर्शनाने काम करणार आहे.

**- अमित भिसे, सचिव,**
शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ

विद्यापीठ, कोल्हापूर पुढारी 28 FEB 2018

# राजर्षी शाहू खऱ्या अर्थाने वंचितांचे मसीहा

## डॉ. बागलकोटी : 'छत्रपती शाहू महाराज यांचे विचार व धोरण यांचे समकालीन औचित्य' विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वत:ला शेतकरी, कामगार आणि सैनिक यांच्यातीलच एक समजणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अथनि वंचित, शोषित, गोरगरिबांचे मसीहा होते, असे प्रतिपादन धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस.टी. बागलकोटी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'छत्रपती शाहू महाराज यांचे विचार व धोरण यांचे समकालीन औचित्य' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बीजभाषक म्हणून बोलत होते. मानव्यविद्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात चर्चासत्राचे रोपट्यास पाणी घालून उद्घाटन करताना डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. एस. टी. बागलकोटी. सोबत अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. व्ही. बी. ककडे आदी.**

शाहू महाराज हे उच्चकोटीचे कृतिशील अर्थतज्ज्ञ होते, असे मत व्यक्त करून डॉ. बागलकोटी म्हणाले, शाहू महाराजांनी शेती, सिंचन, पायाभूत सुविधा विकास, रस्ते विकास, पणन-विपणन, लघु व मध्यम उद्योगांचा विकास आदी अनेक क्षेत्रांचा साकल्याने विचार व विकास केला. त्यामध्ये लोकसहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न केले. उर्ध्वगामी प्रशासनाच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी प्रयत्न केले. गावपंचायत व्यवस्थांची निर्मिती करून लोकांना स्व-प्रशासन देण्याची तयारी दाखविणारे ते एक सच्चे प्रशासक होते. त्यांच्या चरित्रापासून कृतिशीलता, अंगिकृत कार्याप्रती निष्ठा आणि समर्पण या गुणांचा आदर्श आजच्या राज्यकर्त्यांनी घेण्याची गरज आहे. सहभागात्मक विकास, संसाधनांचे समन्यायी वाटप, शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा विकासावर भरीव व नेमका खर्च, शेतीच्या वृद्धीला मदत, सामाजिक-आर्थिक विकासासाठी प्रयत्न, अंधश्रद्धा निर्मूलन आणि विद्वानांचा योग्य आदर याबाबी करण्यासाठी शाहू चरित्रापासून प्रेरणा घेण्याची गरज आहे. या देशाच्या विकासासाठी शाहूंचे विचार व कार्य आजही अत्यंत उपयुक्त आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

डॉ. पाटील म्हणाले, जी व्यवस्था प्रत्येकाला रोजगार देऊ शकते, ती खऱ्या अथनि समावेशी स्वरूपाची असते, याची जाणीव ठेवून काम करण्याची गरज आहे.

यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी सूत्रसंचालन तर डॉ. एम. एस. देशमुख यांनी आभार मानले. यावेळी डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. डी. सी. तळुले, डॉ. आर. जी. दंडगे, डॉ. एस. टी. कोंबडे, डॉ. एस. पी. पंचगल्ले आदी उपस्थित होते.

कोल्हापूर सकाळ 2

# छत्रपती शाहू महाराज वंचितांचे मसिहा : डॉ. बागलकोटी


## शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : स्वतःला शेतकरी, कामगार आणि सैनिक यांच्यातीलच एक समजणारे छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने वंचित, शोषित, गोरगरिबांचे मसिहा होते, असे प्रतिपादन धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. टी. बागलकोटी यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे 'छत्रपती शाहू महाराज यांचे विचार व धोरण यांचे समकालीन औचित्य' विषयावरील दोनदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बागलकोटी म्हणाले, की समाजात समानता, सामाजिक न्याय व वैश्विक बंधुत्वाची भावना प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र झटणारे राजर्षी शाहू महाराज यांची अंगीकृत कार्याप्रती पराकोटीची निष्ठा होती. ब्राह्मणी वर्चस्ववादावर प्रहार करीत असतानाच ब्राह्मणेतर समाजात आत्मोन्नतीची भावना चेतविण्याचे महत्कार्य त्यांनी केले. शाहू महाराज हे उच्चकोटीचे कृतिशील अर्थतज्ज्ञ होते.



**कोल्हापूर : चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. टी. बागलकोटी.**

त्यांनी शेती, सिंचन, पायाभूत सुविधा विकास, रस्ते विकास, पणन-विपणन, लघु व मध्यम उद्योगांचा विकास आदी अनेक क्षेत्रांचा साकल्याने विचार व विकास केला. त्यात लोकसहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. डी. सी. तळुले, डॉ. आर. जी. दंडगे, डॉ. एस. टी. कोंबडे, डॉ. एस. पी. पंचगल्ले उपस्थित होते. अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. एस. देशमुख यांनी आभार मानले.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

28 FEB 2018

# चला, मनामनांत नवचेतना जागवूया!

## फिझिंगा-संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी'

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने यंदाही सलग चौथ्या वर्षी मनामनांत नवचेतना जागवली जाणार आहे. शालेय विद्यार्थी असो किंवा ज्येष्ठांपर्यंत साऱ्यांसाठीच फिझिंगा-संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' या कार्यक्रमातून ही पर्वणी मिळणार आहे.

शनिवार (ता. ३) पासून शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात या मुक्तसंवाद मालिकेला प्रारंभ होणार आहे. दररोज सायंकाळी सहा ते आठ या वेळेत विविध क्षेत्रांतील यशोलौकिकाच्या शिलेदारांशी संवाद साधता येणार आहे. दरम्यान, कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून, मोफत सन्मानिका 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगरातील कार्यालयात उपलब्ध आहेत. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद पान २ वर »

**तीन मार्च :** प्रसिद्ध अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक श्रेयस तळपदे उलगडणार सक्सेस मंत्राज् अन् संकटातही जमिनीवर पाय घट्ट रोवून उभे राहण्याची देणार जिगर.



**चार मार्च :** भारतीय अंध क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री शेखर नाईक देणार सदोदित गतीचे गीत गाण्याची ऊर्जा.



रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा मिश्रा देणार सामाजिक, आर्थिक, पर्यावरणाचा नवविचार.



**पाच मार्च :** सॉफ्टवेअर क्षेत्रातील प्रसिद्ध तंत्रज्ञ राकेश देशमुख सांगणार आयआयटी क्षेत्रातील यशाचे गमक.



प्रसिद्ध जाहिरातकार राज कांबळे उलगडणार जगभरातील जाहिरातींचे विविध ट्रेंड.



**सहा मार्च :** साताऱ्याचे पोलिस अधीक्षक संदीप पाटील उलगडणार नक्षलवाद्यांना माणसात आणण्याचं कौशल्य.



विमाननिर्मितीतील मराठी उद्योजक अमोल यादव पेरणार 'मेक इन इंडिया'ची स्वप्नं.



# चला, मनामनांत नवचेतना जागवूया!

» पान १ वरून

मिळत आहे. सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत सन्मानिकांचे वितरण सुरू आहे.

बॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथाकार सुभाष घई, प्रसिद्ध अभिनेता राहुल बोस, भारत विकास ग्रुप- बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे हणमंतराव गायकवाड, प्रसिद्ध दिग्दर्शक मधुर भांडारकर, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, कुशल संघटक प्रदीप लोखंडे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, ग्लोबल वेलनेस ॲम्बॅसिडर रेखा चौधरी, दिग्दर्शक अभिनय देव, 'व्हेंटिलेटर' चित्रपटाचे दिग्दर्शक राजेश मापुस्कर, विशेष पोलिस महानिरीक्षक कृष्ण प्रकाश आदींशी दिलखुलास संवाद साधण्याची संधी मिळाली होती. यंदाही अशाच नामांकित वक्त्यांची प्रभावळ लाभली आहे. चला तर मग, आजच वेळेचे नियोजन करूया. ३ ते ६ मार्चची सायंकाळ नवप्रेरणादायी करूया...! अधिक माहितीसाठी सूरज जमादार (मोबाईल ९५५२५८१९१८) यांच्याशी संपर्क साधावा.

### मोफत सन्मानिका मिळणार येथे

**'सकाळ' कार्यालय शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर, तसेच रेडिओ सिटी, कार्यालय, धैर्यप्रसाद हॉलजवळ, ताराबाई पार्क कोल्हापूर. श्री ट्रॅव्हल्स, शाहूपुरी, कोल्हापूर येथे मोफत सन्मानिका मिळतील. मोफत सन्मानिकेसह प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल.**

### शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य

- 'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाला गेली चार वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले आहे.
- विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दररोज सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत मुलाखती रंगतील. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था असेल.

### प्रायोजकांविषयी...

- सहप्रायोजक : चाटे शिक्षण समूह, मार्व्हलस् इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, श्री ट्रॅव्हल्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी
- रेडिओ पार्टनर : रेडिओ सिटी


शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

28 FEB 2018

# भौतिकशास्त्रातील अध्वर्यू

# सर सी. व्ही. रमण



भारतात १९८६ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. १९२८ साली याच दिवशी सर सी. व्ही. रमण यांनी आपला नोबेल पारितोषिक विजेता शोध 'रमण परिणाम' जाहीर केला. यानिमित्ताने अक्षर दालन प्रकाशनातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'असे घडले...भारतीय शास्त्रज्ञ' या डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या पुस्तकातील रमण यांच्यावरील लेख प्रसिद्ध करीत आहोत....

भारतावर ब्रिटिशांचे राज्य. १९३० चे ते अविस्मरणीय साल. नोबेल पारितोषिकांची घोषणा झाली. भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक भारतीय संशोधकाला जाहीर झाले. वैज्ञानिक जगताला आश्चर्य वाटले. भारताला विज्ञानात मिळालेले हे एकमेव नोबेल पारितोषिक आणि हा सन्मान मिळवून देणारे संशोधक होते, चंद्रशेखर व्यंकट रमण.

रमण यांचा जन्म ७ नोव्हेंबर, १८८८ रोजी कावेरी नदीच्या काठावरील त्रिचुरापल्लीजवळील थिरुवनईकवल गावी झाला. रमण यांचे वडील शाळेत गणिताचे शिक्षक होते. पुढे ते कॉलेजमध्ये अध्यापन करु लागले. रमण यांनी मॅट्रिकची परीक्षा अकराव्या वर्षी दिली आणि ते उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. त्यांना विविध शिष्यवृत्त्या मिळाल्या. १९०३ मध्ये रमण यांनी प्रेसिडेन्सी कॉलेज, मद्रास येथे बी.ए. (भौतिकशास्त्र)ला प्रवेश घेतला आणि वयाच्या एकोणिसाव्या वर्षी प्रथम क्रमांकाने बी.ए.ची पदवी प्राप्त केली. पुढे एम.ए. ही पदवी प्रथम क्रमांकासह उत्तीर्ण झाले. त्यांना सर्व पारितोषिके मिळाली. विद्यार्थीदशेतच त्यांचा पहिला शोधनिबंध फिलॉसॉफिकल मॅगेझिनमध्ये प्रसिद्ध झाला. त्यावेळी त्यांचे वय केवळ अठरा वर्षांचे होते. एवढ्या उज्ज्वल यशामुळे त्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळाली. मात्र प्रकृती चांगली नसल्याने त्यांना परदेशात जाता आले नाही.

नाईलाजाने त्यांनी नोकरी करायचे ठरवले. भारतीय वित्त सेवेत त्यांची निवड झाली. रमण यांनी येथेही उत्कृष्ट कार्य केले. त्यांना डेप्युटी डायरेक्टर पदावर पदोन्नत केले. त्यांची कोलकाता येथे बदली झाली. त्यावेळी येथे इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स ही संस्था उदयास येत होती. या संस्थेत रमण जाऊ लागले. विज्ञानाची आवड पुन्हा एकदा वर आली. पुढे नागपूर आणि रंगूनला बदली झाली, तरी विज्ञानविषयक विचार त्यांच्या मनातून जात नव्हते. १९११ मध्ये पुन्हा त्यांची बदली कोलकाता येथे झाली. त्यांनी प्रायोगिक संशोधन सुरु केले. प्रशासन सांभाळून संशोधन करणे अडचणीचे वाटू लागले. आशुतोष मुखर्जी यांनी रमण यांना प्राध्यापक पद देऊ केले. धारण केलेल्या पदाच्या पगारापेक्षा अर्धा पगार मिळणार होता. तरीही, रमण यांनी वित्त विभागातील नोकरी सोडली आणि १९१७ मध्ये कोलकाता विद्यापीठात प्राध्यापक झाले.

कोलकाता विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून ते लंडनला गेले. या प्रवासात, समुद्राचे पाणी निळे का दिसते? हा प्रश्न त्यांना पडला. या प्रश्नाचे उत्तर अनेक संशोधकांनी दिले होते. मात्र ते त्यांना पटत नव्हते. हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी भारतात आल्यानंतर सुरु केला. प्रकाशकण स्वत:कडील ऊर्जेचा काही भाग पदार्थातील अणूला देतात आणि प्रकाशाच्या रंगात फरक पडतो हा सिद्धांत त्यांनी मांडला. हा सिद्धांत म्हणजे रमण परिणाम. यासाठी त्यांनी प्रयोगाचे निष्कर्ष पुरावे म्हणून दिले. हा सिद्धांत त्यांनी २८ फेब्रुवारी, १९२८ रोजी जाहीर केला. त्याची आठवण म्हणून आपण १९८६ पासून, हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा करतो.

ब्रिटीश सरकारने १९२९ मध्ये रमण यांना सर ही पदवी प्रदान केली आणि १९३०मध्ये या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक जाहीर झाले. त्यांना बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे संचालकपद दिले. या संस्थेचे संचालक पद भूषविणारे ते पहिले भारतीय होते. या संस्थेत १९४८ पर्यंत ते पदार्थविज्ञानशास्त्र विभागाचे प्रमुख होते. रमण यांनी जागतिक दर्जाच्या प्रयोगशाळा उभारल्या. केंद्रीय कार्यशाळेची उभारणी केली आणि परिसर निसर्गरम्य केला.

त्यांनी सर्व संपत्ती खर्च करुन रमण रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. या संस्थेच्या उभारणीसाठी त्यांनी नोबेल पारितोषिकाचे पैसे तर घातलेच, पण अनेकांकडून निधी जमवला. म्हैसूरच्या महाराजांनी जमीन दिली. मात्र, सरकारकडून कोणताही निधी घेतला नाही. ही इन्स्टिट्यूट चालावी म्हणून त्यांनी कारखाने काढले. नफा संस्थेच्या खर्चासाठी उपलब्ध करुन दिला. इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सचे सदस्यत्व अनेक नामवंतांना दिले. त्यांनी काही संशोधन नियतकालिके सुरु केली. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्यांनी संग्रहालय उभारले. त्यामध्ये रमण यांनी प्रयोगासाठी वापरलेले साहित्य आणि पदार्थ ठेवले आहेत. रमण यांनी विविध विषयावर आपले संशोधन निबंध प्रसिद्ध केले. हिरा आणि हिरकणी या विषयाची सर्व माहिती त्यांनी संग्रहित केली. अस्सल हिऱ्याची पारख करणारे तंत्र त्यांनी शोधले. त्यांनी ६२७ शोधनिबंध प्रसिद्ध केले. २१ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले.

- डॉ. व्ही. एन. शिंदे,
उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ